# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

**प्राचार्य / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक / महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख यांची विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावरील निवडणूक.**

**परिपत्रक**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्राचार्य / अध्यापक / विद्यापीठ अध्यापक / महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख यांची अधिसभेवरील निवडणूक रविवार, दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी, सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पुणे, अहमदनगर व नाशिक येथील एकूण ४५ मतदान केंद्रांवरील १०२ मतदान बुथवर घेण्यात येणार आहे. मतदारांच्या सोयीसाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर "A" आणि "B" अशाप्रकारे दोन बुथ तयार करण्यात आलेले आहेत. तसेच ज्या बुथवर मतदारांची संख्या अधिक आहे तेथे जादा बुथ तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | बुथ "A" वर खालीलप्रमाणे मतदान होईल. | बुथ "B" वर खालीलप्रमाणे मतदान होईल. |
|---|---|---|
| १. | **विद्यापरिषद सदस्य पदासाठीच्या पाच मतपत्रिका** : यासाठी प्राचार्य / संचालक, महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थांतील अध्यापक व विद्यापीठ अध्यापक मतदानास पात्र आहेत. | **अधिसभा सदस्य पदासाठी अध्यापकांच्या सहा मतपत्रिका** : यासाठी प्राचार्य / संचालक व महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अध्यापक मतदानास पात्र आहेत. |
| २. | **अधिसभा सदस्य पदासाठी प्राचार्यांच्या दोन मतपत्रिका** यासाठी प्राचार्य / संचालक मतदानास पात्र आहेत. | **अभ्यासमंडळ सदस्य पदासाठी महाविद्यालयीन/ मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुखांच्या अभ्यासमंडळ निहाय मतपत्रिका** यासाठी महाविद्यालयीन/ मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य / संचालक, अध्यापक, जे संबंधित विषयाचे विभागप्रमुख आहेत. मतदानास पात्र आहेत. |

३. जर मतदार स्वतः प्राचार्य असेल तर तो "A" बुथवर प्राचार्य गटातून अधिसभा सदस्य या पदाकरीता व विद्यापरिषदेकरीता मतदान करील तसेच जर तो विभागप्रमुखही असेल तर "B" बुथवर विभागप्रमुखांमधून अभ्यासमंडळावरील सदस्य या पदाकरीता व महाविद्यालयीन अध्यापक गटातुन सदस्य अधिसभा या पदाकरीता मतदान करेल. म्हणजेच जर प्राचार्य हा विभागप्रमुख असेल तर तो दोनही बुथवर सर्व पदांकरीता मतदान करु शकेल.

४. महाविद्यालयीन अध्यापक "A" बुथवर विद्यापरिषदेकरीता तसेच जर तो विभागप्रमुख असेल तर तो "B" बुथवर अभ्यासमंडळांवरील सदस्य या पदाकरीता व सदस्य अधिसभा या पदाकरीता मतदान करु शकेल.

५. जर मतदार विद्यापीठ अध्यापक असेल तर तो "A" बुथवर सदस्य विद्यापरिषद व विद्यापीठ अध्यापक गटातुन सदस्य अधिसभा या पदाकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्लासरुम कॉम्प्लेक्समधील "A" बुथवर मतदान करु शकेल.

वरील बाबींची संबंधितांनी नोंद घ्यावी.

AS
१६।१।१८

(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

संदर्भ क्र. : साफुपुविनि/४४७
दिनांक : १६/०१/२०१८
प्रत : सर्व संबंधित.

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx